# श्री. मेघराज नारायणराव कोहाड

सेवक क्र. २८१ मु. ३८१, राणी दुर्गावती नगर, बिनाकी ले-आऊट, नागपूर-१७

**जीवनातील प्रत्यक्ष अनुभवलेला अभिनव चमत्कार :**

साधारणतः सन १९७०-७१ मध्ये मी पूर्ण कुटुबांसह तत्त्व आधारित झालो. आम्ही अनेक देव देवतांना मानीत होतो. घरी विठ्ठल रुखमाई, कृष्ण, शंकरजी, भवानी, नागोबा इत्यादी देव देवतांच्या तांब्यापितळीच्या मूर्त्या विराजमान होत्या. सर्व मूर्त्यांची दररोज पूजा करीत होतो. परमेश्वर नावाची एक सर्वमान्य शक्ती असून ती मूर्तीपूजेतच समाविष्ट आहे ही मर्यादित भावना. अडीअडचणीच्या प्रसंगी पूजा अर्चना करावी, नवस आदी ठेवावेत म्हणजे अडीअडचणीतून मार्ग सापडतो. हीच भोळी कल्पना आम्ही मनात ठेवली होती. ह्याच पार्श्वभूमीवर सन १९६२ ते १९७० चा काळ आमच्या जीवनात कसोटीचा ठरला.

सन १९६२ मध्ये माझ्या पत्नीच्या डोक्यात विकृती निर्माण झाली. विकृती एवढ्याकरिता म्हणतो की, त्या विकृतीचे अखेरपर्यंत नामानिधान होऊ शकले नाही. तिला तिच्या डोक्यामध्ये हवा चालल्यासारखा भास होत होता आणि त्यापासुन तीव्र वेदना होत होत्या. रात्रीला झोपेत भयंकर भितीदायक तशीच चित्रविचित्र स्वप्ने पडायची. त्यामुळे ती भयभीत होऊ लागली. त्यातच डोक्यातील वेदना वरचेवर झटके यायचे कधी सारखी रडत रहायची तर कधी सारखी हसत. पुढे पुढे वेदना आणि त्रास असह्य होत गेला. घरच्या लोकांच्या नजरा चुकल्या की जवळपासच्या विहीरीकडे धाव घ्यायची आणि विहीरीमध्ये पाय टाकून काठावर बसून राहायची. कुणाची नजर पडल्यास घरी आणून देत असत. अथवा शोधाशोध करुन आम्हास आणून घ्यावे लागत असे. स्वाभाविकच आमच्या मनात भिती निर्माण झाली आणि कामाच्या वेळी आम्ही तिला बंद खोलीत ठेवू लागलो. तिला एकटे सोडले अथवा एकटीला काम करुण देणे धोक्याचे वाटू लागले. कधी काय करील ह्याचा नेमच उरला नव्हता. पूर्ण कुटुंबात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मुक्तीकरिता घरी पूजत असलेल्या सर्व देव देवतांस अनेक नवस केलेत. बरेच डॉक्टर्स, मेडीकल, दवाखाने पालथे घातलेत. प्रख्यात मनोवैज्ञानिक, तज्ञ पाहिलेत. तसा आमचा बाहेरच्या बाधेवर (जादू टोण्यावर) विश्वास नव्हता. परंतु एक उपाय म्हणून अनेक मांत्रिक जादूटोणेवाले, दरगे, अंगात येणारे देव सर्व काही करुन चुकलो. एवढे हताश झालो की जो जे सांगील तसे करु लागलो. सतत सात-आठ वर्षे सारखे प्रयत्न करुनही काहीच फायदा नाही.

कुठे काहीच थारा लागला नाही. चोहोबाजुंनी हताश झालो. पूर्ण कुटुंबावर नैराश्याची छाया पसरली. कुणाचे कुठेच लक्ष लागेना. जाम वैतागलो. सतत सात–आठ वर्षे संघर्ष करुनही एका कवडीचे समाधान झाले नाही. तेव्हा परिस्थितीच्या घेऱ्यामुळे ती गेलेली बरी ह्या निष्कर्षावर आम्हांस यावे लागले. परंतु विधीलिखित काही वेगळेच होते.

तेवढ्यातच एकदा या तत्त्वावरील सेवक श्री. शंकरराव हेडावू ह्यांची अचानक भेट झाली. त्यांना आमच्या दुःखाची पूर्ण कल्पना होतीच. त्यांनी माझे नैराश्यपूर्ण शब्द ऐकून शेवटचा प्रयत्न म्हणून महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे जाण्याचे सुचविले. जड मनाने मी बाबांकडे गेलो आणि त्यांना पुर्ण इतिहास सांगितला. बाबांनी सहानुभूतीने सर्व ऐकून घेऊन मार्गाची रुपयेषा समजावून दिली व कुटुंबातील मंडळीशी विचार करुन काय ते ठरवावयास सांगितले. माझ्या कुटुंबात वयाने वडील म्हणजे माझी आई. तिचे वय ६०–६५ वर्षांचे. तिला मार्गाची रुपरेषा समजावून देऊन घरी असलेल्या सर्व देवांचे विसर्जन करावे लागेल असे सांगितले. पिढ्यान पिढ्या चालत असलेले सर्व देवतांचे विसर्जन करण्यास तयार होईना. तिला समजावण्यामध्ये दोन महिने पुन्हा निघून गेले व व्यावहारीक भाषेत समजावणी घातल्यानंतर अखेरीस ती पण तयार झाली अशा तऱ्हेने आमचे पूर्ण कुटुंब मार्गावर येण्याचे ठरले. आम्ही पुन्हा एकदा बाबांकडे गेलो बाबांनी पूर्ण मागदर्शन करुन तत्त्वे दिलीत आणि महान आश्चर्य की, अगदी त्याच दिवसापासून माझ्या पत्नीच्या विकृतीत फरक पडत गेला. केवळ पहिल्या अकरा दिवसातच ती निर्मख झाली. बेचाळीस दिवसांच्या समाप्तीच्या दिवशी तिने एकटीने पूर्ण स्वयंपाक करुन सर्व कार्य व्यवस्थित पार पाडले. पूर्वीची ती हीच की काय असा संभ्रम निर्माण होण्याइतपत ती पूर्ण बरी झाली. तेव्हापासून आजतागायत ती त्या विकृतीपासून मुक्त आहे. तिचा तो पूनर्जन्म आणि मागे वैयक्तिक जीवनाचा पुर्नध्दार असेच आम्ही मानतो व मार्गरुपाने मानवी जीवनाचा अमोल ठेवा प्राप्त झाला हे आमचे थोर भाग्य समजतो.

* * * * *